# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेसनोट क्रमांक ३२२/२०२४ दिनांक- २१/०८/२०२४.

## " अग्नीशस्त्राने गोळी झाडुन खून करणाऱ्या गुन्हयातील पाहीजे आरोपीस १६ वर्षानंतर ताब्यात घेण्यात मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेस यश."

दिनांक १९.०१.२००९ रोजी आरपीआय युवा कार्यालय, आचोळे गांव, नालासोपारा पुर्व येथे फिर्यादी लालचंद जैस्वाल, मयत प्रविण प्रभाकर धुळे व साक्षीदर असे नमुद कार्यालयात बसले असताना आरोपी हे पांढरे रंगाचे एंन्डीवर गाडीमधुन येवुन गैरकायदयाची मंडळी व गर्दी करुन पुर्व वैमनस्यातुन मयत प्रविण धुळे यास कार्यालयाचे बाहेर बोलावुन हाताने, दगडाने, विटाने मारहाण करीत असताना फिर्यादी व साक्षीदार हे सोडविण्यास गेले असता त्यांनाही मारहाण करुन आरोपी सिकंदर इम्रान शेख व अनिल दुर्वी सिंग यांनी त्याचे जवळील पिस्टल मधुन मयत प्रविण धुळे याचे पोटावर, गळयावर गोळया घालुन त्यास जिवे ठार मारले म्हणुन नालासोपारा पो.स्टे. गुन्हा नोद क्र. ३२/२००९ भादविसक ३०२, १४४, १४७, १४८, १४९, ३२३, १२०(ब) सह आर्म ॲक्ट कलम ३, २५ (१) (क), २४ (३) सह अनुसुचित जाती जमाती अधिनियम कायदा १९८९ चे कलम ३ (२) (५) प्रमाणे दिनांक १९.०१.२००९ रोजी गुन्हा दाखल असुन सदर गुन्हयाच्या तपासात काही आरोपींना तात्काळ अटक करुन त्यांचे विरुध्द दोषारोपपत्र सादर करण्यात आले होते परंतु पाहीजे आरोपी नामे जे.पी. ऊर्फ जयप्रकाश कोमल सिंग हा गुन्हा दाखल झाले पासुन पोलीसांना मिळुन येत नव्हता.

वरीष्ठ अधिकाऱ्यांनी गंभीर व संवेदनशील गुन्हयातील पाहीजे आरोपीचा शोध घेणेबाबत आदेश केले होते. वरील गुन्हा अतिशय गंभीर स्वरुपाचा असल्याने तसेच नमुद गुन्हयातील पाहीजे आरोपी नामे जे.पी. ऊर्फ जयप्रकाश कोमल सिंग याचा यापुर्वी सर्वोतोपरी शोध घेऊन देखील तो गेल्या १६ वर्षापासुन मिळुन येत नव्हता. त्याअनुषंगाने मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेचे प्रभारी राहुल राख यांनी सपोनि दत्तात्रय सरक, पोहवा. शिवाजी पाटील, गोविंद केंद्रे, हनुमंत सुर्यवंशी असे तपास पथक तयार केले. सदर पथकाने सदर गुन्हयाची नालासोपारा पोलीस ठाणेतुन माहीती घेऊन यातील पाहीजे आरोपीचा शोध घेत असताना आरोपी हा त्याचे मुळ गांव सरैया, पो. आयर, ता.जि.वारासणी, उत्तरप्रदेश येथे गेल्याची माहीती मिळुन आली. त्यानुसार पोलीस पथकाने त्याचे मुळ गांवी जावून सखोल तपास करुन माहीती काढली असता तो नालासोपारा भागात मुळ पत्ता बदलुन सद्या दुसरीकडे राहत असल्याची माहीती प्राप्त झाली. नमुद पोलीस पथकाने गेले ०४ महीनेपासुन सतत अहोरात्र मेहनत घेवुन तपासात सातत्य ठेवून नालासोपारा भागात नमुद पाहीजेत आरोपीचा शोध घेतला असता तो सद्या चॉकलेटचे कंपनीत मार्केटींगचे काम करीत असल्याची माहीती मिळुन आली. नमुद आरोपी हा ओस्तवाल नगरी, नालासोपारा पुर्व येथे येणार असल्याची गुप्तबातमीदाराने माहीती दिली असता तेथे साफळा लावला असता आरोपी तेथुन निघुन गेल्याने त्याचे नालासोपारा रेल्वे स्टेशन ते भाईदर रेल्वे स्टेशन असा रेल्वे प्रवासात पाठलाग करुन त्यास भाईदर रेल्वे स्टेशन, कॅबीन रोड, भाईदर पुर्व येथुन पोलीस पथकाने दिनांक २०.०८.२०२४ रोजी १५.४५ वाजता शिताफिने ताब्यात घेण्यात आलेले आहे.

नमुद पाहीजे आरोपीकडे केलेल्या तपासात त्याचा सहभाग निष्पन्न झाल्याने त्यास पुढील कारवाईकरीता नालासोपारा पोलीस ठाणे यांचे ताब्यात दिले असुन अशा प्रकारे गैरकायदयाची मंडळी जमवुन अग्नीशस्त्रानी गोळी झाडुन खुन करणाऱ्या पाहीजे आरोपीस १६ वर्षानंतर पकडण्यात मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेस यश आले आहे.

सदरची कारवाई ही पोलीस उप आयुक्त (गुन्हे) श्री.अविनाश अंबुरे व सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री. मदन बल्लाळ यांचे मार्गदर्शनाखाली मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेचे प्रभारी पोलीस निरीक्षक राहुल राख, पोनि धनंजय पोरे, सपोनि दत्तात्रय सरक, नितीन बेन्द्रे, पोउपनिरी. हितेंन्द्र विचारे, सहापोउपनिरी.श्रीमंत जेधे, मनोहर तावरे, आसीफ मुल्ला, पोहवा. शिवाजी पाटील, गोविंद केद्रे, हनुमंत सुर्यवंशी, संग्राम गायकवाड, राजाराम काळे, संतोष मदने, सतिष जगताप, राजविर संधु, प्रविणराज पवार, महेश वेल्हे, अनिल नागरे, पोशि. अखिल सुतार, नितीन राठोड, साकेत माघाडे, अंगद मुळे, सफौ.संतोष चव्हाण सर्व नेमणुक मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखा यांनी यशस्वी कामगिरी केलेली आहे.




**--------0000---------**